# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

-------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ / फाल्गुन ९, १९४४ (शके)**

**(१) ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
**(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(३) कामगार मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

-------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४२**

-------------------------------------------

### मौजे भाकरवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील वसना नदीवरील पूल बांधण्याबाबत

**(१) * १७२०८ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाकरवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील वसना नदीवरील पूल सन २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल जळगाव, भाकरवाडी व कोरेगाव या रस्त्याला जोडत असल्यामुळे तेथील नागरिकांना तसेच विद्यार्थी व रुग्णांना लांब वळसा घालून ये - जा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

भाकरवाडी जोड रस्ता (ता.कोरेगाव, जि.सातारा) या ग्रा.मा.१०० वरील साकवाचा वाहक मार्ग अतिवृष्टीमुळे काही प्रमाणात वाहून गेलेला होता.

(२) अंशत: खरे आहे.

अतिवृष्टीवेळी १ ते २ दिवस पुलावरुन पाणी जात असल्यामुळे वळसा घालून जावे लागते.

(३) हे खरे आहे.

(४) सदर साकवाच्या वाहक मार्गाची मुरुम टाकून तात्पुरती दुरुस्ती ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आली असून त्यावरुन वाहतूक सुरु करण्यात आलेली आहे. तसेच सदर पुलाची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मेळघाट या आदिवासी भागासह इतर जिल्ह्यांतील बालमृत्यू रोखण्याकरिता कार्यवाही करण्याबाबत

**(२) * १६९५३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.श्रीकांत भारतीय : तारांकित प्रश्न क्रमांक १०४०१ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मेळघाट या आदिवासी भागात सहा टक्के प्रसूती घरातच होत असून सन २०२१-२२ मध्ये मुलांमध्ये पहिल्या २८ दिवसांमध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण ६० टक्के असून, २९ दिवस ते एक वर्ष या कालावधीमध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण हे २० टक्के असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२१ ते मे, २०२२ या कालावधीत राज्यात ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण २२ हजार ४५१ बालमृत्यू झाल्याची बाब माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय, तसेच बालमृत्यूचे महत्त्वाचे कारण कुपोषण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेळघाट या आदिवासी भागातील महिलांचे विवाह हे बालवयात होत असल्यामुळे अर्भकाचे वजन कमी असून बालमृत्यूचे प्रमाण वाढत असून कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमातून जनजागृती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, गरोदर स्त्रियांची आणि मुलांची काळजी घेण्यासाठी स्त्रीरोगतज्ञ आणि आहारतज्ञांची नियुक्ती करुन कुपोषण समस्येचे निमुर्लन करण्याच्या दृष्टीने मेळघाट परिसरात अद्ययावत रुग्णालय बांधण्यात येणार आहे काय तसेच मेळघाटसह इतर आदिवासी भागांमध्ये कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूचे तसेच गरोदर माता व अर्भकांचे मृत्यू रोखण्याच्या दृष्टीने प्रसुती सुलभ होण्याकरीता सदर भागात स्त्रीरोग तज्ञांची नेमणूक करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, मेळघाटातील बालमृत्यू हे श्वसनविकार, न्यूमोनिया, सेप्सीस ह्या विकारांमुळे होत असल्याचेही निदर्शनास आले असून कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू कमी करण्यासाठी राज्यातील आदिवासी भागांमध्ये राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकारच्या योजनांच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी राहिल्यामुळे या योजनांचे लाभ संबंधितांना मिळत नसल्याची बाब आदिवासी विकास विभागाने माहे डिसेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा त्यादरम्यान प्रसिध्द केलेल्या अभ्यास अहवालामध्ये अधोरेखित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सध्या राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनांची सद्य:स्थिती व त्यातील त्रुटी दूर करून ‘मिशन-२८’ सारखी अग्रेसर मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज असल्याचे सदरहू अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शहरी व ग्रामीण भागातील तसेच मेळघाटातील बालमृत्यू रोखण्यासाठी कुपोषणाच्या समस्येचे निवारण करण्याच्या दृष्टीने ‘मिशन -२८’ मोहीम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

मेळघाटामध्ये एप्रिल, २०२२ ते डिसेंबर, २०२२ अखेर ६ टक्के प्रसूती घरात होत असून सन २०२१-२२ मध्ये ० ते ५ वर्ष वयोगटात झालेल्या बालमृत्यूमध्ये पहिल्या २८ दिवसामध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण ५२ टक्के असून, २९ दिवस ते एक वर्ष या कालावधीमध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण २७ टक्के व १ ते ५ वर्ष वयोगटातील बालमृत्यूचे प्रमाण २१ टक्के आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी २०२०-२१ ते माहे मे २०२२ या कालावधीत राज्यात ० ते ५ वयोगटातील एकूण २३००८ बालमृत्यू झाल्याची नोंद आहे. मात्र सदरील बालमृत्यू हे कमी दिवसाचे, कमी वजनाचे जन्म, सेप्सिस,न्युमोनिया,जन्मजात व्यंग, Respiratory Distress, Birth Asphyxia, इत्यादी कारणामुळे झालेले असून कुपोषणामुळे झाल्याची नोंद नाही.
(३) मेळघाट भागातील बालविवाह रोखण्याकरीता महिला व बालकल्याण विभागामार्फत आकांक्षा पथकाची स्थापना करण्यात आली असून आकांक्षा पथकामार्फत तसेच महसूल विभागामार्फत बालविवाह रोखण्याची कारवाई करण्यात येते.

मेळघाट या आदिवासी भागात कुटुंब नियोजनासाठी रॅली, पोस्टर, बॅनर, होर्डिंग्स, भिंतीचित्रे दुरचित्रवाणीव्दारे प्रसिध्दी, आकाशवाणीव्दारे संदेश, आरोग्य संस्थेत कुटुंब नियोजन कोपरा स्थापना, स्थानिक कोरकू भाषेतील समाज माध्यमांव्दारे संदेश प्रसारण इ. विविध प्रचार व प्रसार माध्यमांचा वापर करुन जनजागृती करण्यात येत आहे. तसेच आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्ती यांच्याव्दारे समुपदेशन कीट व प्लीप बुकचा वापर करुन कुटुंब नियोजनास पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष भेटून कुटुंब नियोजनाचा अवलंब करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे,
(४) मेळघाट भागामध्ये माहे जानेवारी, २०२२ मध्ये २ ग्रामीण रुग्णालये (धुळघाट रेल्वे व टेंभुरसोंडा), ४ प्राथमिक आरोग्य केंद्र (टिटंबा, चाकर्दा, गौरखेडा बाजार, आवागड) व १३ उपकेंद्र नव्याने मंजूर केलेले आहे. धारणी उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन १०० खाटांच्या रुग्णालयात करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपजिल्हा रुग्णालय धारणी, ग्रामीण रुग्णालय चिखलदरा, ग्रामीण रुग्णालय चुरणी येथील पोषण पुर्नवसन केंद्रामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे ३ आहारतज्ञांची पदे मंजूर असून २ आहारतज्ञ सद्य:स्थितीत सेवा देत आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक अधिनस्त संस्थांमध्ये ३ कंत्राटी व प्रतिनियुक्तीवर ४ तज्ञ (२ स्त्रीरोग तज्ञ व २ बालरोग तज्ञ) कार्यरत आहेत.

राज्यस्तरावरुन ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर चक्राकार पध्दतीने १५ दिवसांकरीता १३ स्त्रीरोग तज्ञ व १३ बालरोग तज्ञांची नियुक्ती करण्यात येते. यापैकी दिनांक १४/०२/२०२३ रोजी ८ स्त्रीरोग तज्ञ व ७ बालरोग तज्ञ मेळघाट भागात सेवा देत आहेत.

(५) हे खरे नाही.

मेळघाट भागात आरोग्य सुविधा अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व स्तरावर नियमित संनियंत्रण, प्रशिक्षण घेण्यात येते. तसेच जिल्हा स्तरावर व राज्य स्तरावर संनियंत्रण व समन्वय सभा घेण्यात येतात.

आदिवासी विकास विभागाने प्रसिध्द केलेल्या अभ्यास अहवालानुसार मेळघाट व नंदुरबार जिल्ह्यात सध्याचे कार्यक्रम अधिक प्रभावी पध्दतीने राबविण्यासाठी शिफारस केली आहे.

मेळघाटात विविध कारणांमुळे होत असलेले बालमृत्यू टाळण्यासाठी आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे स्थानिक पातळी पासून तर राज्य स्तरावर कार्यक्रमाने संनियंत्रण करण्यात येत आहे. मेळघाटातील कार्यक्षेत्रात भेटी देवून आढळलेल्या बाबींबाबत विभागामार्फत सतत सुधारात्मक कार्यवाही करण्यात येते.

मेळघाट क्षेत्रात तज्ञ डॉक्टर्स, माता व बालकांची तपासणी सुविधात सुधारणा आणि नवीन आरोग्य संस्था निर्माण करणे, अतिरिक्त रुग्णवाहिका कार्यान्वित करणे या बाबींवर प्राधान्याने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच राज्यातील अती जोखमीच्या मातांचे निदान करून त्यांना आवश्यक ते उपचार करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत व सर्व आरोग्य कर्मचारी यांचे याबाबतचे प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे.

(६) “मिशन- २८” हि मोहीम मेळघाटात सद्य:स्थितीत सुरू आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, मेळघाटात ‘मिशन-२८’ ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर राज्यातील इतर अदिवासी भागांत सदर मोहिम सुरु करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील विशेषत: वाशिम जिल्ह्यातील १८ अंगणवाडी केंद्रांकडे महावितरणच्या वीज देयकाची रक्कम थकीत असल्याबाबत

**(३) * १७८०५ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: वाशिम जिल्ह्यातील १८ अंगणवाडी केंद्रांकडे महावितरणच्या वीज देयकापोटी एक लाख ४४ हजार २६ रुपयांची रक्कम थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाडी केंद्राची वीज देयके न भरल्याने वीज पुरवठा खंडीत करून विजेचे मीटर काढण्यात आल्याने सदर १८ अंगणवाड्या अंधारात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील तसेच वाशिम जिल्ह्यातील शाळा व अंगणवाड्यांचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.
(२) वाशिम जिल्ह्यातील सदर १८ अंगणवाडी केंद्रांपैकी एकूण ७ अंगणवाडी केंद्रांवर सद्य:स्थितीत विद्युत पुरवठा सुरळीत सुरु असून ६ अंगणवाडी केंद्रावरील विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात आलेला आहे. तसेच उर्वरीत ५ अंगणवाडी केंद्रांचे वीज पुरवठा खंडीत करुन वीज मिटर काढण्यात आलेले आहेत.
(३)सदर प्रकरणी चौकशी केली असता अंगणवाडी केंद्रांना ग्रामपंचायत मार्फत सदरहु विद्युत जोडणी करुन देण्यात आलेली असून वीज देयकसुध्दा ग्रामपंचायत मार्फत अदा करण्यात येत होते. परंतु मागील काही कालावधीमध्ये ग्रामपंचायतींनी संबंधित अंगणवाडी केंद्रांचे विद्युत देयक अदा केले नाही. त्यामुळे सर्व संबंधित ग्रामपंचायतींना क्षेत्रिय कार्यालयामार्फत सदरहु देयक अदा करुन वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात हाफकीन महामंडळामार्फत रोबोटीक सर्जरी प्रणाली खरेदीची प्रक्रिया करण्याबाबत

**(४) * १७१२० श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १३६९२ ला दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे प्रस्तावित रोबोटीक सर्जरी युनिटच्या खरेदीसाठी खनिकर्म मंडळाने निधी देऊनही युनिटच्या खरेदी प्रक्रियेस तीन वर्षे विलंब झाला असून मा.उच्च न्यायालयाने हा प्रकल्प पूर्ण करावा तसेच त्यासाठी वाढीव खर्च देण्याची सूचना शासनाला केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,रोबोटीक सर्जरी युनिटच्या खरेदीकरीता शासनाच्या विहित नियमानुसार हाफकीन महामंडळामार्फत अनेकदा पुनर्निविदा प्रक्रिया राबवून सहभाग दर्शविलेल्या व न्युनतम दर असलेल्या निविदाकाराकडून निविदा अंतिम करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सुरुवातीला रोबोटीक युनिटची १७ कोटी रुपये असणारी किंमत २१ कोटी रुपये पर्यंत वाढल्याचे निदर्शनास आले असून, हाफकीन महामंडळाला सुरुवातीला १७ कोटी रुपये देण्यात आले, परंतु खनिकर्म मंडळाकडून अधिकचे ४ कोटी हाफकीनकडे पाठविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, हाफकीन महामंडळामार्फत रोबोटीक सर्जरी प्रणाली खरेदीची कार्यवाही सुरु असून वारंवार टेंडर प्रकिया राबवून व आवश्यक निधी उपलब्ध असतानाही रोबोटीक सर्जरी प्रणालीची खरेदी होत नसल्याबद्दल लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे प्रस्तावित रोबोटीक सर्जरी युनिटची खरेदी प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.
(२) हाफकीन महामंडळामार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) रोबोटीक युनिटसाठी लागणारा अतिरिक्त निधी हाफकीन महामंडळाकडे वर्ग करण्यात आला आहे.
(४) व (५) निविदा प्रक्रियाबाबत हाफकीन महामंडळाविरुध्द न्यायालयीन प्रकरण दाखल करण्यात आले होते. सदर न्यायालयीन प्रकरण मा.उच्च न्यायालयाने खारीज केले असून हाफकीन महामंडळामार्फत रोबोटिक सर्जरी प्रणाली खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## होमिओपॅथी (BHMS) पदवीधारकांना आयुष्मान भारत योजनेत समाविष्ट करण्याबाबत

**(५) * १७३०२ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या धोरणानुसार होमिओपॅथी (BHMS) पदवीधारकांना आयुष्मान भारत या योजनेत समाविष्ट करून घेणे क्रमप्राप्त असूनही पात्र डॉक्टरांना सदर योजनेपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कम्युनिटी हेल्थ ऑफीसर (CHO) पदाच्या पदभरती करीता दिनांक ९ डिसेंबर, २०१९ रोजी काढलेल्या जाहिरातीनुसार होमिओपॅथी (BHMS) धारकांना या भरती प्रक्रियेत डावलण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर भरती प्रक्रिया सद्य:स्थितीत प्रलंबित राहिल्यामुळे होमिओपॅथी (BHMS) डॉक्टरांना पदभरती प्रक्रियेत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यामध्ये आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत फक्त समुदाय आरोग्य अधिकारी पदावर आयुर्वेदिक,युनानी व नर्सिंग उमेदवारांची निवड केली जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी व हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(६) * १७५३१ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी उपजिल्हा रुग्णालयाचे (जि.वर्धा) श्रेणीवर्धन करुन १०० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यात येऊन अद्याप सेवा सुविधा उपलब्ध नसल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या दर्जात वाढ करून ४०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव आरोग्य विभागाकडे दिनांक १३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, वर्धा यांनी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगणघाट शहराची भौगोलिक परिस्थिती पाहता सदर रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे आवश्यक असल्याने सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रुग्णालयात सोयी सुविधा उपलब्ध होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २८/११/२०१८ अन्वये आर्वी येथील उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयास श्रेणीवर्धन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली असून, सदरहू श्रेणीवर्धन रुग्णालयाचे बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखड्यांना शासनाने शासन निर्णय दिनांक १४/११/२०२२ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत आर्वी येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामार्फत आरोग्य सुविधा पुरविण्यांत येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक ०५/१२/२०२२ रोजीच्या आयुक्तालय, आरोग्य सेवा यांच्या पत्रान्व्ये शासनास प्रस्ताव प्राप्त झाला. त्याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याकारणाने प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्यासाठी दिनांक २२/१२/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये आयुक्तालय, आरोग्य सेवा यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विक्रोळी येथील सिद्धीविनायक सोसायटीची पार्किंग लिफ्ट कोसळून कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

**(७) * १६९६५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी येथील सिद्धीविनायक सोसायटीच्या पार्किंग लिफ्ट मध्ये दुरुस्तीचे काम सुरु असताना, सदर पार्किंग लिफ्ट इमारतीच्या २३ व्या मजल्यावरून कोसळून एका कामगाराचा मृत्यू झाला असून ३ कामगार जखमी झाले असल्याची दुर्घटना दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुर्घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधित सोसायटीचे पदाधिकारी व संबंधितांवर कारवाई करुन मृत्यू पावलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री.सिध्दीविनायक को. ऑप. सोसायटी, लोकमान्य नगर, विक्रोळी (प.), मुंबई या सोसायटीच्या इमारतीमध्ये टॉवर लिफ्ट पार्किंगचे काम चालू असताना पार्किंग लिफ्टचे लोखंडी पॅलेट अंगावर कोसळून दिनांक ०४/०१/२०२३ रोजी शिवमकुमार जैस्वाल या कामगाराचा मृत्यू झाला असून अन्य कोणीही कामगार जखमी झालेला नाही.

(२) कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर (पूर्व) यांचे कार्यालयातील क्षेत्रिय अधिकारी यांनी साईटवर प्रत्यक्ष भेट देवून मुख्य विकासक व संबंधित कंत्राटदार आस्थापनेस इमारत व इतर बांधकाम कामगार (कामगारांचे नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६, किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० या विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे पारीत केले आहेत.

तसेच मे.सौर जगत बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्स (मुख्य विकासक) या आस्थापनेच्या बांधकाम साईट बांधकामाच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील तरतुदींनुसार इमारतीच्या बांधकामास कामबंद/मनाई आदेश दिनांक १३/०१/२०२३ रोजी पारीत करण्यात आलेले आहेत.

मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयास तसेच मुख्य विकासक व कंत्राटदार यांना कामगार उपायुक्त, मुंबई उपनगर (पूर्व) यांच्या कार्यालयाच्या दिनांक १६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर अपघाताशी संबंधित विकासकांचे प्रोजेक्ट मॅनेजर आणि संबंधित कंत्राटदार यांच्यावर भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ए व ३४ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०८, दिनांक ०४/०१/२०२३ रोजी पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंगणवाडी सेविकांच्या प्रलंबित मागण्या मान्य करुन अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) * १७००७ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.कपिल पाटील, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर, श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५८३९ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी सेविकांच्या कामाचे स्वरूप पाहता ते अर्धवेळ नसून पूर्णवेळ असल्याने त्यांना पूर्ण वेतन द्यावे, अंगणवाडी सेविकांना दैनंदिन कामासाठी नवीन कार्यक्षम मोबाईल द्यावे, पोषण ट्रॅक ॲप राजभाषेत द्यावा, सर्व मृत अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना व सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवा समाप्ती लाभाची रक्कम विना विलंब द्यावी, वाढत्या महागाईच्या प्रमाणात पूरक पोषण आहाराचे दर वाढवून द्यावे, पूर्व प्राथमिक शिक्षक म्हणून शासकीय सेवेत कायम करावे, नियमित वेतन दयावे आणि शिक्षकांच्या अन्य सुविधा लागू कराव्यात इत्यादी प्रमुख मागण्यांसह अन्य विविध प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन केले असून प्रशासनाला तसेच शासनाला डिसेंबर महिन्यातील कोणतीही माहिती किंवा अहवाल न पाठविण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांच्या २० हजार पेक्षा अधिक पदांची लवकरच भरती सुरू करण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे काय तसेच राज्यात दोन लाख अंगणवाडी कर्मचारी असून त्यापैकी अंगणवाडी सेविकांना दरमहा रुपये ८५०० तर मदतनीसांना रुपये ४४५० दरमहा मिळणाऱ्या मानधनात गत ५ वर्षांत शासनाने सुधारणा केलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एनईपी २०२० या केंद्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार पूर्व प्राथमिक शिक्षणाला पायाभूत शिक्षणाचा घटक व पहिला टप्पा म्हणून मान्यता मिळाली असल्यामुळे या स्तरावर काम करणाऱ्या राज्यातील अंगणवाडी सेविकांना पूर्व प्राथमिक शिक्षकाचा दर्जा देणे आणि सेवा व अर्हता नियम निश्चित करणे आवश्यक बनले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तामिळनाडू, तेलंगणा,आंध्र प्रदेश,दिल्ली, केरळ या राज्यात अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अधिक मानधन मिळत असून त्या धर्तीवर महागाईनुसार मानधनात वाढ करणे, शासकीय कामासाठी त्वरित नवीन मोबाईल देणे, पोषण ट्रॅकर ॲप मराठीतून देणे, सर्व मृत अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना व सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवा समाप्तीच्या लाभाची रक्कम विनाविलंब देणे आदी मागण्यांचा त्यात समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा, पंचायत समिती बालविकास प्रकल्प् कार्यालयातंर्गत अंगणवाडी सेविकांची १३ पदे तर मदतनीस १४ पदे रिक्त असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एनईपी २०२० नुसार आवश्यक प्रशिक्षण, नियुक्ती, दर्जावाढ आणि वेतनातील सुविधा देण्याबाबत कार्यक्रम आखण्याबाबत तसेच अंगणवाडी सेविकांच्या प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करुन अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ०९/०१/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाड्यांकरीता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ११/१०/२०२२ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये अंगणवाडी सेविका यांना पूर्व प्राथमिक शिक्षणाचा दर्जा देणे अशी बाब नाही. तसेच एकात्मिक बालविकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाने विहित केलेल्या सेवा शर्तीनुसार अंगणवाडी सेविका या मानधनी तत्वावर कार्यरत आहेत.
(४) अंगणवाडी कर्मचारी संघटनेकडून अशा मागण्या करण्यात आलेल्या आहेत.
(५) चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा पंचायत समिती बालविकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत अंगणवाडी सेविकांची १४ पदे तर अंगणवाडी मदतनीस यांची १३ पदे रिक्त आहेत.
(६) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत अंगणवाडी कर्मचारी संघटना समवेत वेळोवेळी बैठक आयोजित करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ०९/०१/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचे समन्वयाने अंगणवाडी सेविकांकरीता प्रशिक्षण घटकसंच निर्मिती करण्यात आली असून माहे नोव्हेंबर, २०२२ पासून अंगणवाडी सेविकांना Online प्रशिक्षण देण्यात येत आहे.

-----------------

## मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्याबाबत

**(९) * १७१४१ श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १५७२५ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सन २०१९ मध्ये शासनाने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली असून प्रकल्पाचा प्रथम टप्पा सुरू करण्यासाठी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, सदर योजनेमुळे वर्षानुवर्षे पडत असलेला दुष्काळ निवारण्यासाठी मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मराठवाडा वॉटर ग्रीडची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यास मंजूरी देण्यात आली असून पहिल्या टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण व पुढील टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील इतर भाग, बीड, उस्मानाबाद, लातूर आणि उर्वरित पुढील टप्प्याबाबत निधी व पाण्याच्या उपलब्धतेनुसार निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत जल जीवन मिशन अंतर्गत परतूर, मंठा, पैठण, गंगापूर-वैजापूर, सिल्लोड, जळकोट-उदगीर, हदगाव-हिमायतनगर, भोकर-अर्धापूर-मुदखेड, व पालम या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे काय, तसेच सदरील योजनांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाबाबत केंद्र शासनाकडे अनुपालन अहवाल पाठविण्याची कार्यवाही व त्याबाबतचा पाठपुरावा विभागामार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर योजनेमुळे मराठवाड्यातील वर्षानुवर्षे पडत असलेला दुष्काळ निवारण होऊन मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मराठवाड्याला मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर महत्वाकांशी प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१), (२), (३), व (४) होय, हे खरे आहे.
(५) हे अंशत: खरे आहे.

मराठवाडा वॉटर ग्रीड ही योजना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी मर्यादीत आहे. मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मराठवाड्याला मिळण्याबाबत पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत वळण योजना घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात येते.
(६) मराठवाडा वॉटर ग्रीड महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात शासनाने जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत परंतुर, मंठा, पैठण, गंगापूर-वैजापूर, सिल्लोड, जळकोट-उदगीर, हदगाव-हिमायतनगर व भोकर-अर्धापूर-मुदखेड या ग्रीड योजना मंजूर केल्या असून, सदर योजनेचे कार्यारंभ आदेश निर्गमित केले आहे.

-----------------

## राज्यात “मिशन वात्सल्य” योजनेंतर्गत पंडिता रमाबाई व्याज माफी योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१०) * १७१९० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.नरेंद्र दराडे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील,**

**डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१०१ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाने कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन झाल्याने विधवा झालेल्या महिलांच्या उपजिविकेसाठी तसेच मातृ-पितृछत्र हरपलेल्या अनाथ बालकांच्या संगोपनासाठी शासनाने "मिशन वात्सल्य" योजनेंतर्गत बालसंगोपन तसेच महिलांच्या रोजगारासाठी "पंडिता रमाबाई व्याजमाफी" योजना अंमलात आणून बालसंगोपन या योजनेंतर्गत मिळणारी मदतीची रक्कम रुपये ११००/- वरुन रुपये २५००/- करण्याचे तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी आश्वासित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालसंगोपन योजनेंतर्गत अनुदानाची रक्कम वाढविणे तसेच पंडिता रमाबाई व्याजमाफी योजनेंतर्गत व्याज माफ करणे या दोन्हींचे शासन निर्णय अद्याप निर्गमित केले नसल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून, याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य कोरोना एकल महिला पुनर्वसन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच स्वरुपाच्या योजनेंतर्गत उत्तर प्रदेश बाल सेवा योजनेंतर्गत प्रतिमहिना चार हजार रुपये, कर्नाटक शासनाकडून साडे तीन हजार रुपये, उत्तराखंड वात्सल्य योजनेंतर्गत साडे तीन हजार रुपये, मध्य प्रदेश शासनाकडून पाच हजार रुपये तर राजस्थान शासनाकडून पालनहार योजनेंतर्गत वाढीव अनुदान देण्यात येत असताना, राज्य शासनाने त्याबाबतचा अभ्यास करुन निर्णय घेतला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे, तसेच प्रलंबित शासन निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्कफोर्सची निर्मिती करून अशा बालकांना आर्थिक मदत, धान्य, शैक्षणिक मदत याबाबतची प्रक्रिया करण्यात आली आहे काय, तसेच मराठवाड्यातील जिल्ह्यात जिल्हा निहाय करण्यात आलेल्या मदतीची माहिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, यासंदर्भात निधीची तरतूद करुन उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच अद्यापपर्यंत पूर्ण लाभ न मिळालेल्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) बालसंगोपन योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार शासन निर्णय क्र.बालसं-२०२२/प्र.क्र.७६/का-८ दिनांक १७/०२/२०२३ निर्गमित करण्यात आला आहे

(४) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्क फोर्स गठित करण्यात आला आहे. महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक १७/०६/२०२१ अन्वये कोविड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दोन्ही पालक गमावलेल्या अनाथ बालकांच्या नावे ५ लाख रुपये मुदत ठेव ठेवण्याचा व सदर रक्कम २१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्याजासह देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून एकूण ८०० बालकांच्या नावे रुपये ५.०० लक्ष इतकी रक्कम मुदत ठेव म्हणून जमा करण्यात आली आहे. त्यामध्ये मराठवाडा विभागातील ९४ बालकांचा समावेश आहे.

मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यांमध्ये कोविड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे एक अथवा दोन्ही पालक गमावलेल्या एकूण २०९९ बालकांच्या परिपोषणासाठी व शैक्षणिक खर्चासाठी बाल संगोपन योजनेंतर्गत ₹११००/- प्रति लाभार्थी प्रतिमाह याप्रमाणे लाभ देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत निवडलेल्या चार खासगी कंपन्यांनी कोटयवधी रुपयांचा अपहार केल्याबाबत

**(११) * १७७२३ श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १५४१० ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बेरोजगार तरुण-तरुणींना दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी छत्तीसगड येथील सुर्या वायर्स प्रा.लि., नाशिकमधील ध्येयपूर्ती, पुण्यातील जाईजुई, ॲस्टर फलेअर ॲण्ड लेदर या चार कंपन्यांची निवड करुन शासनाकडून कोट्यवधींचा निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संस्थांनी अग्रीम रक्कम घेऊनही विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे तसेच ज्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे अशा विद्यार्थ्यांना या संस्थांनी नोकरी उपलब्ध करुन दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, या चारही संस्थांच्या विरोधात नवी मुंबई येथील सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात FIR करण्याकरीता लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली असून त्यापैकी सूर्या वायर्स प्रा.लि. कंपनीला ७ कोटी २६ लाख रुपये ॲडव्हान्स रक्कम देऊनही त्यांनी प्रशिक्षण दिले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सूर्या वायर्स प्रा.लि. या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून न्यायालयाने नेमलेल्या लवादाबाबत राज्य व्यवस्थापन कक्षाकडून हरकत घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सदर संस्थांना देण्यात आलेला निधी परत मिळविण्याबाबत पोलिसांमार्फत कार्यवाही सुरु असून उक्त संस्थांच्या संचालकांवर बोजा चढविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदान घेऊनही विद्यार्थ्यांना प्रशिक्षण न दिलेल्या सदरील कंपन्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) सदर कंपन्यांची निवड केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आलेली असून योजनेच्या नियमावली नुसार निधीचा पहिला हप्ता प्रकल्पाच्या एकूण रक्कमेच्या २५% वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) याबाबत सदरहू चारही कंपन्यांनी परिपूर्ण दस्तऐवज राज्य व्यवस्थापन कक्ष कार्यालयास अद्यापपर्यंत जमा केले नाहीत. त्यामुळे योजनेच्या नियमावलीनुसार प्रशिक्षण व नोकरी दिलेल्या आकडेवारीची पडताळणी करता आलेली नाही.
(३) व (४) हे खरे आहे.
(५) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सदर संस्थांना देण्यात आलेला निधी परत मिळविण्याबाबत पोलीसांमार्फत कार्यवाही सुरु आहे. तथापि, उक्त संस्थांच्या संचालकावर बोजा चढविण्यात आलेला नाही.
(६) योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रशासकीय कार्यवाहीअंती राज्य व्यवस्थापन कक्ष कार्यालयाकडून सूर्या वायर्स प्रा.लि., ध्येयपूर्ती सेवा स्वयंरोजगार प्रशिक्षण को-ऑपरेटीव्ह सोसायटी, जाईजुई चॅरिटेबल ट्रस्ट व मे. अपेरल ॲण्ड लेदर टेकनिक्स प्रा.लि. या चार प्रकल्प अंमलबजावणी संस्थांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे यांना लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली असून त्यापैकी सूर्या वायर्स प्रा.लि. या संस्थेविरुध्द FIR दाखल करण्यात आलेला आहे.

तथापि, सूर्या वायर्स प्रा.लि. या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून न्यायालयाने लवाद नेमूणक केला आहे. सदर लवादबाबत राज्य व्यवस्थापन कक्षाकडून हरकत घेण्यात आली आहे.

सदर संस्थांना देण्यात आलेला निधी परत मिळविण्याबाबत राज्य व्यवस्थापन कक्षाकडून पोलीसांमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्ययावत साहित्याचा पुरवठा करण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(१२) * १७५४५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्ययावत साहित्याची आवश्यकता असून साहित्याअभावी अनेक समस्या निर्माण होत असून, सदर साहित्यासाठी अंदाजे पाच कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्ययावत साहित्याचा पुरवठा करण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२२ रोजी रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री,पालघर जिल्हा यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने पालघर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांच्या तपासणीकरीता अद्ययावत साहित्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन दरवर्षी औषधे /साहित्याची मागणी घेण्यात येते. जिल्हा परिषद, पालघर यांना प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन शासकीय निकषाप्रमाणे ECL/EDL यादीतील औषधे / साहित्य विहित प्रक्रियेने खरेदी करुन प्राथमिक आरोग्य केंद्राना उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रास काही औषधे / साहित्याचा पुरवठा राज्यस्तरावरुन करण्यात येतो.

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधे /साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून त्याव्दारे रुग्णांवर उपचार चालु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने IPHS निकष तपासून आवश्यक साहित्य खरेदीबाबत प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

तथापि, निवेदनात नमुद साहित्य अभावी प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर रुग्णसेवे करीता अडचण निर्माण झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांगरी (ता.बार्शी, जि.सोलापूर) गावानजीक फटाके निर्मिती करणाऱ्या कारखान्यास आग लागून कामगार मृत्यूमुखी पडल्याबाबत

**(१३) * १७२२५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.महादेव जानकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांगरी (ता.बार्शी, जि.सोलापूर) गावानजीक फटाके निर्मिती कारखान्यात दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आग लागून झालेल्या भीषण दुर्घटनेत तीन महिला होरपळून जागीच मृत्यूमुखी पडल्या व अन्य तिघी गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटांमुळे संपूर्ण परिसर हादरुन गेला असून या घटनेत अनेक जण मृत्यू पावले तसेच अनेक जण जखमी झाल्याचे निदर्शनास आले असून उक्त कारखान्यात आजूबाजूच्या गावातील कामगार कामासाठी येत असून ४० कामगार फटाके बनविण्याचे काम करीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फटाक्याच्या कारखान्याला शासनाने मान्यता दिली आहे काय,

(४) असल्यास, या दुर्घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या स्फोटात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना तसेच जखमींना तातडीने आर्थिक सहाय्य मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) इंडियन फायर वर्क्स,गट नं.४६९, पांगरी, ता.बार्शी, जि.सोलापूर या फटाके निर्मिती करण्याऱ्या कारखान्यात दिनांक ०१/०१/२०२३ रोजी लागलेल्या आगीमुळे स्फोट होऊन,तीन महिला कामगारांचा घटनास्थळी मृत्यू झाला. तसेच इतर दोन गंभीर जखमी झालेल्या महिला कामगारांचा वैद्यकीय उपचारादरम्यान मृत्यू झालेला आहे. तसेच एक महिला मजुर जखमी झालेली होती.

तसेच दिनांक ०१/०१/२०२३ रोजी कारखाना परिसरात कारखान्याचा मालक व ११ कामगार उपस्थित होते.

(३) नाही.

(४) सदर दुर्घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली आहे.

चौकशीदरम्यान दिनांक ०१/०१/२०२३ रोजी कारखान्यात जेसीबी मशिनच्या सहाय्याने खड्डे तयार करण्याचे काम सुरू होते. यादरम्यान जेसीबी मशिनचे ब्लेड व दगड यामध्ये घर्षण झाल्यामुळे तेथे ठिणगी निर्माण झाली. ती ठिणगी जमिनीवर विखुरलेल्या अवस्थेत असणाऱ्या शोभेच्या फटाक्याच्या ज्वलनशील दारूवर पडली.त्यामुळे शोभेच्या दारूने पेट घेऊन, आग लागून स्फोट झाला असल्याचे आढळून आले आहे.

सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ च्या नियम भंगाबाबत मा.न्यायदंडाधिकारी, सोलापूर यांचे न्यायालयात एकत्रित फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

तसेच पांगरी पोलीस ठाणे,ता.बार्शी जि.सोलापूर येथे भारतीय दंड संहिता,१८६० व भारतीय विस्फोटक अधिनियम, १८८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून,दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणातील आरोपींना परवाना प्राप्त जागेव्यतिरिक्त अन्य ठिकाणी विषयांकिंत व्यवसाय केल्याने त्यांचे नांवे असलेले अधिकृत परवाने रद्द करण्यात आले आहेत.

मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून योग्य ती मदत मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे कार्यालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तसेच मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत आयुक्त,नुकसान भरपाई सोलापूर आणि कारखाना भोगवटादारास नुकसान भरपाई त्वरीत देण्याबाबत उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,सोलापूर यांनी दिनांक ०३/०१/२०२३ व दिनांक ०९/०१/२०२३ रोजी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांदोरी व नागापूर (ता.निफाड, जि.नाशिक) या गावांतील पाणीपुरवठा योजनेतंर्गत अनियमितता झाल्याबाबत

**(१४) * १७४१५ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोरी व नागापूर (ता.निफाड, जि.नाशिक) या मोठ्या महसूल गावात गेल्या १२ वर्षांपूर्वी २.५० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसताना बनावट देयके तयार करुन अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे काम पूर्ण झालेले नसतानाही बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीतून गावास पाणीपुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक जिल्हा परिषदेने सदर पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केली नसतानाही ग्रामपंचायत दर वर्षी अनधिकृतपणे पाणीपट्टी आकारात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर योजना ग्रामपंचायतीकडे दिनांक १५/०८/२०१७ रोजी हस्तांतरीत केली असून, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, चांदोरी यांचेमार्फत सदर योजना चालविण्यात येत आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जामनेर (जि.जळगाव) येथील जिल्हा परिषदेचा भूखंड बीओटी तत्वावर विकसित करण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) * १७६५३ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१६१ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामनेर (जि.जळगाव) येथील जिल्हा परिषदेचा भूखंड बीओटी तत्वावर विकसित करण्याच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीला माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये ग्रामविकास विभागाने मुदतवाढ दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,चौकशी समितीने शासनाकडे अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशी अहवालातील निष्कर्ष काय आहेत व सदर दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर चौकशी समितीचा अहवाल अद्यापही अप्राप्त आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील जखमी खेळाडूस शासनाकडून औषधोपचाराचा सर्व खर्च मिळणेबाबत

**(१६) * १७४७९ श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५६५७ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय क्रीडा स्पर्धा तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धा सुरु असताना एखादा खेळाडू जखमी झाल्यास त्याच्या औषधोपचाराचा सर्व खर्च शासनाकडून करण्याबाबत खेळाडूंकडून संबंधित विभागाकडे वारंवार मागणी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंचा विमा राज्य शासनाने व विद्यापीठ क्रीडा स्पर्धांतील खेळाडूंचा विमा विद्यापीठाने उतरविणे या बाबत संघटनेकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जखमी झालेल्या खेळाडूंच्या औषधोपचाराचा सर्व खर्च मोफत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशतः खरे आहे.
शासकीय स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंचा विमा राज्य सरकारने व विद्यापीठ स्पर्धांतील खेळाडूंचा विमा विद्यापीठाने उतरविणे या बाबतचे संघटनेचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) दिनांक २१/०६/२०२२ च्या शासन निर्णयानुसार, शालेय क्रीडा स्पर्धेतील जखमी खेळाडूस प्रत्यक्ष हॉस्पीटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त रुपये ०१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच राज्यातील विविध विद्यापीठांद्वारे क्रीडा स्पर्धेत जखमी झालेल्या खेळाडूंना औषधोपचारासाठी विमा योजना, प्रत्यक्ष औषधोपचाराचा खर्च, सदर वैद्यकीय खर्चाचा परतावा, इ. स्वरुपात मदत केली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(१७) * १७६९३ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सन २०१७-१८ मधील HIN४८ अंतर्गत रामा १६१ ते तळाटवाडी-मोरवड-खरवड या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर रस्ता पूर्णत: खड्डेमय झाला असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर कामाच्या कंत्राटदारावर व जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

सदर रस्ते कामाची विहित कार्यपध्दतीनुसार राज्य गुणवत्ता समन्वयक यांचे स्तरावर तपासणी झाली असून यास समाधानकारक शेरा प्राप्त झाला आहे. सदर रस्त्यावरुन अतिजड वाहतूकीमुळे रस्त्याच्या काही भागात खड्डे पडले होते. सदर रस्त्यावरील खड्डे दुरुस्ती व उर्वरित कामे माहे मार्च, २०२३ अखेर कंत्राटदाराकडून पूर्ण करुन काम अंतिम करण्यात येत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त रस्ते तथा पुलांची दुरूस्ती करून निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(१८) * १६९२३ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत अतिवृष्टी व पुरहानीमुळे नुकसान झालेले रस्ते तथा पुल दुरूस्ती बांधकामाकरीता निधी उपलब्ध करून देणेबाबत दिनांक ७ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारीअधिकारी, जि.प. नागपूर यांनी ग्रामविकास विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावात नागपूर जिल्ह्यातील इजिमा / ग्रामदर्जाच्या रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्यासाठी रुपये १२७.९३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची प्रस्तावित केलेली मागणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यात तातडीने रस्ते व पुल बांधकाम दुरूस्ती करीता आवश्यक निधी जि.प. नागपूर ला उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या व त्यावरील पुलांच्या दुरुस्तीसाठी शासनाने दिनांक ०९/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अतिवृष्टी व पुरहानी कार्यक्रम (लेखाशीर्ष ३०५४-२९११) ही नवीन योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेतंर्गत वित्त विभागाने निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त रस्त्यांच्या/पुलांच्या दुरुस्तीकरीता जिल्हा परिषदांना निधी वितरीत करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयास औषधांचा पुरवठा करण्याबाबत

**(१९) * १७६६७ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात गत पाच महिन्यांपासून औषधांचा पुरवठा झाला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातून जिल्ह्यातील २ स्त्री रुग्णालये, ९ ग्रामीण रुग्णालये, ५ उपजिल्हा रुग्णालये व ५ ट्रॉमा केयर युनिट व अन्य ठिकाणी औषधांचा पुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अन्य रुग्णालयाना औषधांचा पुरवठा होत नसल्यामुळे गरीब रुग्णांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयास तात्काळ औषधांचा पुरवठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) (अ) (ECRP II) अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी.

(ब) शासनाकडील औषधांसाठी उपलब्ध असणारा १० टक्के निधी.

(क) राष्ट्रीय आरोग्य अभियान, अमरावती यांना औषधी व साधन सामग्री खरेदी करीता उपलब्ध असलेला निधी.

(ड) जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा नियोजन समिती अमरावती यांचेकडील निधी.

यामधून औषधे व साधन सामुग्री खरेदी करण्यात येत असून ती रुग्णांस उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळा (जि.रायगड) येथील ग्रामीण रुग्णालय अद्ययावत सोयी सुविधांसह सुरु करण्याबाबत

**(२०) * १६९८८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरिकांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा तालुक्याच्या ठिकाणीच मिळाव्यात यासाठी तळा (जि.रायगड) शहरात सुसज्ज असे ग्रामीण रुग्णालय उभारण्यात आले असून या ग्रामीण रुग्णालयात कोणत्याही प्रकारचे साहित्य, यंत्रसामग्री उपलब्ध नसून, रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग मंजूर करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन पालकमंत्री यांनी तळा ग्रामीण रुग्णालयात अधिकारी व कर्मचारी वर्ग मंजूर करून ग्रामीण रुग्णालय सुरू होण्याचे आश्वासन तळावासी यांना दिले होते या घटनेस पाच महिन्यांचा कालावधी होऊनही तळा शहरातील ग्रामीण रुग्णालय बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तळा प्राथमिक आरोग्य केंद्रातही पुरेशा प्रमाणात कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे या रुग्णालयात येणारे अपघातग्रस्त रुग्ण, गरोदर महिला, सर्प दंश, विंचू दंश रुग्णांना प्रथमोपचार करून नजीकच्या माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत असून रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना देखील मानसिक त्रास सहन करावा लागतो तसेच काही वेळा रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसल्याने त्यांच्या जीवितासही धोका निर्माण होऊन आरोग्याच्या बाबतीत तेथील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तळा ग्रामीण रुग्णालय तातडीने सुरू करण्याबाबत तळावासीयांकडून होणाऱ्या मागणीचा विचार करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) मौजे तळा (ता.तळा, जि.रायगड) येथील ग्रामीण रुग्णालय बांधण्याकरीता शासन निर्णय दिनांक २४ जून, २०१३ अन्वये तळा, जि.रायगड येथील ग्रामीण रुग्णालय मुख्य इमारतीसाठी रुपये ४५०.०० लक्ष एवढया रक्कमेच्या बांधकामाच्या अंदाजपत्रक आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. सद्य:स्थितीत इमारतीचे बांधकाम ८० टक्के पूर्ण झाले आहे. तसेच दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदनिर्मिती करण्यात आली आहे. तथापि, ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याने ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित करण्यात आलेले नाही.
(३) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र तळा, येथे एकूण १५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १२ पदे भरलेली असून ३ पदे (कुष्ठरोग, तंत्रज्ञ, शिपाई, स्त्री परिचर) रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांवर योग्य ते औषधोपचार करण्यात येतात. तसेच आवश्यकतेनुसार पुढील संदर्भ सेवेसाठी त्यांना उपजिल्हा अथवा जिल्हा रुग्णालयास संदर्भित केले जाते.
(४) ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लवकरच कार्यान्वित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कसबे वणी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील ग्रामपंचायतीमध्ये जन्म दाखल्या ऐवजी मृत्यूचा दाखला देण्यात आल्याबाबत

**(२१) * १७१५४ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कसबे वणी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील रियाज अमीनखान मुल्ला यांचा १८ वर्षीय मुलगा अली रियाज खान याचा जन्मदाखला घेण्याकरीता ग्रामपंचायतीकडे अर्ज केला असता त्याला मृत्यूचा दाखला

हाती सोपविल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदरचे प्रकरण नाशिक जिल्ह्यातील कसबे वणी (ता.दिंडोरी) येथील नसून ग्रामपंचायत चंडिकापूर, ता.दिंडोरी येथे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आलेले आहे.
(२) अर्जदार यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशी दरम्यान श्रीमती सविता ढुमसे, ग्रामसेवक, ग्रा.पं. चंडिकापूर, ता.दिंडोरी ह्या दोषी आढळून येत असून त्यांच्याविरुध्द नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती दिंडोरी यांनी संबंधित ग्रामसेवक यांचे विरुध्द महाराष्ट्र जि.प., जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ मधील तरतुदीनुसार खातेनिहाय विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर येथे जिल्हा शासकीय रूग्णालय तसेच ट्रॉमा केअर सेंटरची निर्मिती करण्याबाबत

**(२२)** * **१७८५८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी बहुल लोकसंख्येचा जिल्हा म्हणून पालघर जिल्ह्याची निर्मिती दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी झाल्यानंतर आजमितीस ८ वर्षांहून अधिक कालावधी होवूनही सदर जिल्ह्यात शासकीय रूग्णालय तसेच ट्रॉमा केअर सेंटर, कार्यान्वित नसल्यामुळे ग्रामस्थ आरोग्य सुविधांपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-अहमदाबाद महामार्गावर प्रतिदिन मोठ्या प्रमाणावर अपघात होत असून अपघातग्रस्त जखमी रूग्णांना घोडबंदरपासून ते गुजरात राज्याचा सीमाभाग असलेल्या आच्छाडपर्यंत तसेच मुंबई, गुजरात किंवा केंद्रशासित प्रदेशातील रूग्णालयात उपचारांसाठी न्यावे लागत असून अत्याधुनिक रूग्णालयाच्या अभावामुळे इतर ठिकाणी रुग्णालयात पोहोचण्यास होत असलेल्या विलंबामुळे मृत्यू झाल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपघातग्रस्त जखमींना तात्काळ उपचार मिळावेत याकरीता महामार्गालगत दोनशे खाटाचे रूग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरची निर्मिती करण्यासाठी ५० कोटी रूपयाच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती व तद्नंतर तांत्रिक मान्यता आणि निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर सन २०१९ मध्ये रूग्णालयाच्या बांधकामाचे कार्यादेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पालघर जिल्ह्यात २०० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरच्या इमारतीचे बांधकाम माहे मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असताना अद्यापही सदर काम अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आदिवासी बहुल लोकसंख्येचा जिल्हा असलेल्या पालघर येथे जिल्हा शासकीय रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरची निर्मिती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२०-२०२१ पासून माहे जानेवारी, २०२३ अखेरपर्यंत एकूण ३०८२ अपघात रुग्ण उपजिल्हा रुग्णालय, कासा, ग्रामीण रुग्णालय, मनोर व ग्रामीण रुग्णालय, तलासरी याठिकाणी दाखल झाले होते. त्यापैकी २८७४ रुग्णांवर उपचार करण्यात आले व उर्वरित २०८ रुग्ण हे गंभीर स्वरुपाचे असल्यामुळे त्यांना पुढील उपचाराकरीता संदर्भित करण्यात आले.
(३) हे खरे आहे.
(४) करोना कालावधीत लॉकडाऊन लागू केल्याने इमारतीचे बांधकाम बंद होते. २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले असून सद्दस्थितीत ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय, मनोरचे श्रेणीवर्धन करुन २०० खाटांचे रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारत बांधकामाचे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील १८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता व प्रवेश शुल्क रक्कम मिळण्याबाबत

**(२३) * १७९२१ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात १८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून, बहुतांश ठिकाणी नियमित प्राचार्य वर्ग नसल्यामुळे इतरांकडे कार्यभार सोपविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान वाढ केलेली असून निर्वाहभत्ता आणि प्रवेश शुल्क गत चार वर्षांपासून आदिवासी विद्यार्थ्यांना मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयटीआयच्या सर्व व्यवसायामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विकास विभागाने मंजूर केल्यानुसार प्रतिमाह निर्वाहभत्ता देण्याची तरतूद आहे, यासाठी आदिवासी विकास विभागाकडून अनुदानही दिले जाते, त्यामुळे शासनाकडून अनुदान प्राप्त झाले असताना प्रशिक्षणार्थ्यांना निर्वाह भत्याचे वाटप झाले नसल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील १८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्या वेतनात वाढ होवून अनुसूचित जमातीतील प्रशिक्षणार्थ्यांना तात्काळ निर्वाह भत्ता अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

डिसेंबर, २०२२ व त्यादरम्यान निर्वाहभत्ता व विद्यावेतनात कोणतीही वाढ झालेली नाही. व आदिवासी विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारचे प्रवेश शुल्क आकारले जात नाही. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील १८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना एकात्मिक आदिवासी विकास विभागाकडून मंजूर झालेल्या यादीनुसार निर्वाह भत्याची रक्कम वाटप करण्यात आलेले असून उर्वरित विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(२४) * १८०७४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांच्या मागण्यांबाबत महाराष्ट्र निराधार व देवदासी महिला संघटनामार्फत आंदोलने, मेळावे, धरणे इ.माध्यमातून शासनास अनेकदा निवेदन देवूनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यांमध्ये निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत राज्यातील देवदासींचे सर्व्हेक्षण करण्याची जबाबदारी सामाजिक संस्थेकडे देण्याबाबत, संजय गांधी निराधार योजनेतील १५ वर्षांच्या वास्तव्याची अट रद्द करुन एक वर्षाची करण्याबाबत, वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रक्कम रु १,५०, ०००/- करण्याबाबत, विधवा महिलांना हयात असेपर्यंत अनुदान मिळण्याबाबत इत्यादी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त, महिला व बालविकास विभाग यांना दिनांक २४ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करणे यांसह इतर मागण्या पूर्ण करण्याबाबत निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करुन त्यांच्या इतर मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) नाही.
(२) संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना रुपये १०००/- दरमहा इतके अर्थसहाय्य दिले जाते. तसेच, विशेष सहाय्य योजनेतील १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना रुपये ११००/- तर २ व त्यापेक्षा अधिक अपत्ये असलेल्या विधवा लाभार्थ्यांना एकूण रुपये १२००/- इतके अर्थसहाय्य दरमहा देण्यात येते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक ०३/०५/२०२१ अन्वये सदर योजनेसाठी किमान १५ वर्षापासून राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. तथापि, विधवा महिलांकरीता (इतर राज्यातून लग्न होऊन आलेल्या) किमान १५ वर्ष महाराष्ट्र राज्यात रहिवासी असल्याची अट शिथील करण्यात आली आहे. परंतु, सदर महिलेचा पती हा किमान १५ वर्ष महाराष्ट्र राज्यात रहिवासी असणे अनिवार्य राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे.
(३) होय, निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) महाराष्ट्र राज्याच्या चौथ्या प्रस्तावित महिला धोरणामध्ये समाजातील निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी विविध उपाययोजनांचा समावेश करण्यात आला असल्याने स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याबाबत

**(२५) * १८१४३ प्रा.राम शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५७५४ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) येथील सन २०१७ पासून प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेली रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची असून, उक्त कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सन २०१७ पासून कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) मधील एकूण ६२ कामे मंजूर असून त्यापैकी ५३ कामे पूर्ण झालेली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत सदर कामांच्या विविध टप्यांवर वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक व राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्याकडून झालेल्या तपासणीत निकृष्ट दर्जाच्या कामात सुधारणा करणे आवश्यक असलेल्या ठेकदारांकडून कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर कामांपैकी असमाधानकारक (U) व समाधानकारक परंतु सुधारणा करणे (SRI) अशा शेरे प्राप्त असलेल्या कामात ठेकेदाराकडून सुधारणा करुन घेऊन त्यावर वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक व राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या कडून तपासणी करुन घेऊन समाधानकारक (S) शेरा प्राप्त झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ‘एम’ वॉर्डामधील बोगस पॅथालॉजी लॅबवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(२६) * १७०३९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ‘एम’ विभागामध्ये बोगस पॅथालॉजी लॅबमध्ये केलेल्या चाचणीत आजाराचे योग्य प्रकारे निदान न करण्यात आल्याने एका नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत अनेक वर्षांपासून मानखुर्द, गोवंडी, कुर्ला, लोटस कॉलनी, बैंगनवाडी या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ‘एम’ वॉर्डच्या परिसरामध्ये बोगस पॅथालॉजिस्टची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ‘एम’ वॉर्डसह राज्यभरातील बोगस पॅथालॉजी लॅबवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा दरम्यान एम/पूर्व विभागात एका नवजात बालकाचा मृत्यू झाला असून, सदर मृत्यू हा बोगस पॅथॉलॉजीलॅबमुळे झालेला नसून, तो खाजगी रुग्णालयातील संशयित बोगस डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याचे शिवाजी नगर पोलीस स्टेशन, गोवंडी यांच्या तपासणीमध्ये निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनमार्फत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) व (३) दिनांक २९ जुलै, २०२१ च्या शासन निर्णयान्वये, वैद्यकीय प्रयोगशाळा (मेडिकल लॅबोरेटरी) व्यवसायासंदर्भात नियंत्रण व नियमन याबाबत मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली व संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती यांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने अहवाल सादर केलेला आहे. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे अधिकच्या मुद्यांची माहिती अध्यक्ष, वैद्यकीय प्रयोगशाळा नियंत्रण व नियमन समिती तथा आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडून मागविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व जिल्ह्यातील महिलांना संजीवनी अभियानाचा लाभ मिळण्याबाबत

**(२७)** * **१७८२० श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लातूरसह इतर जिल्ह्यांतील महिलांच्या आरोग्याच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्यावतीने संजीवनी हे अभिनव अभियान राबविण्यात आले त्यात लातूर जिल्ह्यातील ११६ महिलांमध्ये प्री कॅन्सर (कर्करोग पूर्वावस्था) आढळला परंतु या आजारावर उपचारासाठी जन आरोग्य आयुष्मान योजनेत सदर आजाराचा समावेश नसल्याने या गरीब महिला आरोग्याच्या लाभापासून वंचित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, जन आरोग्य आयुष्मान योजनेत प्री कॅन्सर (कर्करोग पूर्वावस्था) या आजाराचा समावेश करून राज्यातील सर्व जिल्ह्यातील महिलांना जन आरोग्य आयुष्मान योजनेचा लाभ घेता येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संजीवनी या अभियानाचा लाभ प्रत्येक जिल्ह्यातील महिलेला घेता यावा याकरीता जन आरोग्य आयुष्मान योजनेत प्री कॅन्सर (कर्करोग पूर्वावस्था) या आजाराचा समावेश करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२) व (३) महिलांमध्ये प्री कॅन्सर (कर्करोग पूर्वावस्था) या आजारांवर उपचार करण्यासाठी एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत "LLETZ (large loop excision of the transformation zone)" या उपचारपध्दतीचा समावेश केलेला आहे. त्यामुळे लाभार्थी महिला या उपचारांचा लाभ घेऊ शकतात. सबब, लाभार्थी महिला या उपचारापासून वंचित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हा परिषदेने १५ वा वित्त आयोगांतर्गत बाधित व अबाधित प्राप्त निधी ग्रामपंचायतींकडे वर्ग करण्याबाबत

**(२८) * १७४९९ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत ५०४ ग्रामपंचायतींचा १५ वा वित्त आयोगांतर्गत बाधित व अबाधित असा प्राप्त २६ कोटी ८४ लक्ष रुपये निधी ग्रामविकास विभागाने आदेश देऊनही गेल्या २ महिन्यांपासून ग्रामपंचायतीकडे वर्ग केला नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी ग्रामपंचायतीस प्राप्त न झाल्याने विकासाच्या कामांना गती येत नसून सदर कामे निधी अभावी प्रलंबित असून शासन सदर निधी वर्ग करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, वर्धा यांना तातडीने देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वर्धा जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला निधी जिल्ह्यातील विकासकामांकरीता ग्रामपंचायतींकडे वर्ग करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) अशी बाब नाही.

सदर निधी हा ग्रामपंचायत स्तरावर दिनांक १२/०१/२०२३ रोजी वर्ग करण्यात आलेला आहे.

(३) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील टाईड निधीबाबत वर्धा तालुक्यातील ६ ग्रामपंचायती बीम्स (BEAMS) या प्रणालीवर मॅप झालेल्या नव्हत्या. सदरच्या तांत्रिक अडचणीचे निवारण झाल्यानंतर सन २०२१-२२ चे देयक दिनांक २१/१२/२०२२ अन्वये देयक कोषागारात सादर करण्यात आले. परंतु सदर देयकाला वाढीव अनुदानाची मूळ शाईची प्रत जोडण्यात यावी असे आक्षेप लावण्यात आले. सदर आक्षेपांची पुर्तता करून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील देयक दिनांक ०२/०१/२०२३ अन्वये फेरसादर करण्यात आले. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत प्राप्त बंधित व अबंधित निधीचे देयक कोषागारात पारित करून दिनांक १२/०१/२०२३ रोजी CMP पोर्टलव्दारे ५०४ ग्रामपंचायतीच्या खाती निधी जमा करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील अविघ्न टॉवर या १५ मजली निर्माणाधीन इमारतीतील लिफ्ट कोसळून कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

**(२९) * १७५९४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील अविघ्न टॉवर या १५ मजली निर्माणाधीन (अन्डर कन्स्ट्रक्शन) इमारतीतील लिफ्ट कोसळून दोन कामगारांचा दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत कामगारांच्या कुटुंबाला आर्थिक मदत करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने मृत कामगारांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत मिळण्याच्या दृष्टीने तसेच सदर प्रकरणी या घटनेत दोषी असणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कंत्राटदारामार्फत मयत कामगार नूर आलम व जमिल रहमत अली यांचे वारसदारास अनुक्रमे रक्कम रुपये २,२०,०००/- व रुपये १,५०,०००/- इतकी प्राथमिक मदत देण्यात आली आहे.

(३) अविघ्न हाऊस, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी नाका, मुंबई या इमारतीच्या काचा साफ करण्याचे काम करीत असताना दिनांक ०९/०१/२०२३ रोजी दोन कामगारांचा १९ व्या मजल्यावरुन पडून अपघाती मृत्यू झाला.

मे.फेअरलीप प्रॉपर्टीज यांच्या मे.अविघ्न हाऊस, (मुख्य मालक) या आस्थापनेविरुध्द कामगार उप आयुक्त, मुंबई शहर कार्यालयामार्फत इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत दिनांक १३/०१/२०२३ रोजी निरीक्षण शेरे पारीत केले आहेत.

मे.अविघ्न हाऊस या आस्थापनेचे बांधकाम साईट सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील तरतूदीनुसार दिनांक २०/०१/२०२३ रोजी कामबंद आदेश बजावण्यात आले आहेत.

तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ आणि कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत विकासक आणि कंत्राटदार यांच्यावर खटले दाखल करण्याची कार्यवाही कामगार उपआयुक्त, मुंबई शहर यांच्या कार्यालयामार्फत चालू आहे.

नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, मुंबई यांना मृत कामगारांच्या वारसास भरपाई मिळवून देण्याकरीता दिनांक २०/०१/२०२३ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र परिचर्या परिषदेतील नोंदणी प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३०) * १७६५६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलने नोंदणीकृत केलेल्या ३७,००० परिचारिकांना बोगस ठरविण्यात आले नसून महाराष्ट्र परिचर्या परिषदेतील नोंदणी प्रक्रियेमध्ये अनियमितता झाली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महाराष्ट्र परिचर्या परिषदेतील अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी दिनांक १४/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय, समितीच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महाराष्ट्र परिचर्या परिषदेतील नोंदणी प्रक्रियेत झालेली अनियमितता तपासून संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे, महाराष्ट्र परिचर्या परिषदेने कोविड-१९ या साथरोग काळात परिचर्या प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या २१,०६५ विद्यार्थ्यांची नोंदणी करताना गुणपत्रिका व उत्तीर्ण प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने परिचारिका महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी साक्षांकित केलेल्या निकालाच्या आधारे नोंदणी करण्यात आल्या आहेत.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मनोरुग्णालयांतील सर्व संवर्गातील रिक्त पदे सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत भरण्याबाबत

**(३१) * १७४८९ श्री.जयंत आसगावकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रादेशिक मनोरूग्णालय व जिल्हा स्त्री रूग्णालय येथे दंत चिकित्सकांची पदे प्रस्तावित करून नेमणूक करणेबाबत प्रशासकीय कार्यवाही अद्यापही पूर्ण झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दंत मुख रोग विकार, मुख कर्करोगाचे प्रमाण अलीकडच्या काळात खूप वाढत असल्याने या रोगाचे निदान व उपचारासाठी प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेमध्ये दंत चिकित्सकांची नेमणूक होणे आवश्यक असल्याने मनोरूग्णालय व जिल्हा स्त्री रूग्णालयामध्ये दंत चिकित्सकांची पदे निर्माण करून ती भरण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, राज्यात मानसिक आजारांवर वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असतानाही त्यांच्यावर उपचार करण्यास डॉक्टर उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून मनोरुग्णालयांतील अ,ब,क गटातील ३५ टक्क्यांहून अधिक जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने माहिती व निर्णय घेऊन या रुग्णालयांतील गरजू रुग्णांसाठी मदत मिळण्यासाठी प्रशिक्षित वैद्यकीय तज्ञांसह समुपदेशकांची उपलब्धता करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रादेशिक मनोरूग्णालय व जिल्हा स्त्री रूग्णालय येथे दंत चिकित्सकांची पदे मंजूर नाहीत. तथापि, प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथे दंतशल्य चिकित्सकाची सेवा उसनवारी तत्वावर घेण्यात आलेली आहे. प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे दंतशल्यचिकित्सक हे पद राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वावर भरण्यात आलेले आहे. प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे व रत्नागिरी येथे दंतशल्य चिकित्सकांच्या सेवा उपलब्ध नाहीत. परंतु शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अथवा जिल्हा सामान्य रुग्णालयातील कार्यरत दंतशल्यचिकित्सकामार्फत प्रादेशिक मनोरुग्णालय व जिल्हा स्त्री रुग्णालयांतील दंतमुख रोग विकारग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यात येतात.
(३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय अधिकारी सेवा, गट-अ वर्ग-१ ची मनोविकृती विशेष तज्ञांच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारशी करण्यात आल्या असून पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबत प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
(४) टेलिमानस या कार्यक्रमाद्वारे मनोरुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना हेल्पलाईन क्रमांक १४४१६ द्वारे निशुल्क २४ तास मानसोपचाराविषयी समुपदेशन करण्यात येते.

-----------------

## हिंगोली जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरुन रुग्णालयाचा विस्तार करण्याबाबत

**(३२) * १७७३९ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हा रुग्णालयातील अपघात विभागात अनेक वर्षापासून केवळ ६ बेड्स उपलब्ध असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यात न्युरो सर्जन व कार्डिओलॉजिस्ट नियुक्त करणे आवश्यक असतानाही सध्या ही दोन्ही पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगोली जिल्हा रुग्णालयातील रुग्णांना उपचारासाठी बेड्स उपलब्ध नसल्यामुळे तसेच वैद्यकीय तज्ञांच्या अभावी नजिकच्या जिल्ह्यात जावे लागत असल्यामुळे रुग्णांच्या वेळेचे व आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने हिंगोली जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरून रुग्णालयाचा विस्तार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) जिल्हा रुग्णालयाच्या निकषानुसार न्युरो सर्जन व कार्डिओलॉजिस्ट ही पदे मंजूर नाहीत.

(३) जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे प्राथमिक व व्दितीय स्तरावरील सेवा रुग्णासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तथापि, तृतीय स्तरावरील सेवाकरीता रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे पाठविण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोरगड व झिल्पा (ता.काटोल, जि.नागपूर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेबाबत

**(३३) * १६९२६ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील भोरगड व झिल्पा प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नागपूर यांनी आरोग्य विभागास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र असलेल्या भोरगड व झिल्पा आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्ण झालेले असून आरोग्य केंद्र कार्यान्वित न झाल्याने तथा आवश्यक पदभरती न केल्याने आरोग्य सुविधेचा लाभ सुमारे १०० गावातील नागरीकांना प्राप्त होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उपरोक्त दोन्ही आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेबाबत तथा आवश्यक पदभरती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

भोरगड व झिल्पा येथे पदनिर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्यामार्फत आयुक्तालयास सादर केला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मौजे भोरगड येथे ॲलोपॅथिक दवाखाना व मौजे झिल्पा येथे आयुर्वेदिक दवाखाना कार्यरत आहे. त्यामार्फत गावातील नागरिकांना आरोग्य सेवा नियमित देण्यात येतात. सदर दोन्ही गावे प्राथमिक आरोग्य केंद्र कचारीसावंगा या अंतर्गत येत असून त्यामार्फतही आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

पदनिर्मितीबाबतची कार्यवाही चालू आहे. यावर लवकरच निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) येथील शासकीय रुग्णालयात आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * १७६७३ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट विभागातील धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) या आदिवासीबहुल तालुक्यांमध्ये ब्लड बँक व रक्त साठविण्यासाठी आवश्यक अद्ययावत यंत्रणा तसेच पुरेसे वैद्यकीय तज्ञ उपलब्ध नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) येथील जिल्हा उप रुग्णालयात एकूण १३ स्त्रीरोग तज्ञ, १३ बालरोग तज्ञ आवश्यक असून फक्त ६ स्त्रीरोग तज्ञ व ५ बालरोग तज्ञ रुजू झाले आहेत, उर्वरित जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मेळघाट विभागातील धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) या अतिदुर्गम तालुक्यांतील ग्रामीण रुग्णालयात औषधाचा तुटवडा तसेच सोनोग्राफी मशिन, एक्स रे मशीन नसणे, रेडीओलॉजीस्ट नसणे, मोटर व अँब्युलन्स बंद असणे इत्यादी तक्रारी आदिवासी भागातून होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) या आदिवासीबहुल तालुक्यांमधील ग्रामीण रुग्णालयात आरोग्यविषयक अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच वैद्यकीय तज्ञांची रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

दिनांक २६/०९/२०२२ च्या शासन निर्णयान्वये उपजिल्हा रुग्णालय धारणी, जि.अमरावती येथे रक्तपेढी निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे २ स्त्रीरोग तज्ञ, २ बालरोगतज्ञ, १ भुलतज्ञ तसेच ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा येथे नियमित बालरोगतज्ञाचे पद भरण्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त मेळघाट विभागात जानेवारी, २०२२ पासून रोटेशन पध्दतीने या ठिकाणी १३ बालरोगतज्ञ व १३ स्त्रीरोगतज्ञ यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे सोनोग्राफी प्रशिक्षित स्त्रीरोग तज्ञामार्फत सोनोग्राफी सेवा दिल्या जातात. ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा व चुर्णी येथे खाजगी वैद्यकीय व्यवसायामार्फत सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच वैद्यकीय अधिकारी व तज्ञांची रिक्त पदे भरणेसंदर्भात शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील एच.एम.आय.एस. यंत्रणा वैदयकीय शिक्षण विभागाने बंद केल्याबाबत

**(३५) * १७१५५ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील एच.एम.आय.एस. यंत्रणा वैद्यकीय शिक्षण विभागाने बंद करुन पाच महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील ससून रुग्णालयातील यंत्रणा बंद असल्यामुळे ससून रुग्णालयासह राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांना त्यांचे केस पेपर, तपासणी पेपर मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर यंत्रणा बंद असल्याने सर्व संगणक व इतर साहित्य विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर यंत्रणा बंद करण्यामागची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने यास जबाबदार /दोषी असणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सदर प्रकल्पाबाबत वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालयामार्फत करण्यात आलेल्या लेखापरिक्षणांमध्ये पुरवठादाराने सेवा करारानुसार सर्व सेवा पुरविल्या नसल्याची बाब निर्दशनास आली. तद्नंतर सेवा पुरवठादारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा मागे घेण्याबाबत नोटीस देण्यात आली. सदर नोटीस संदर्भात आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिनांक ०५/०७/२०२२ रोजी सेवा पुरवठादारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा वापर बंद करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच यासंदर्भात आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या दिनांक ०५/०७/२०२२ च्या परिपत्रकान्वये सर्व संस्थेच्या अधिष्ठातांना सूचना देण्यात आल्या.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत रस्त्यांच्या विकास कामांच्या अभिलेख्यांची जिल्हानिहाय माहिती मागविण्याबाबत

**(३६) * १८०३१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे ३४ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यात 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना' व 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजने' अंतर्गत सुमारे १ हजार २४३ रस्त्यांच्या केलेल्या विकास कामांबाबत माहे मार्च, २०२० ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीतील अभिलेख्यांची माहिती `भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक' यांनी मागवली असल्याची बाब दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या अनुपालन अहवालातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना' व 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजने' अंतर्गत रस्त्यांची विकास कामे कोणत्या जिल्ह्यात करण्यात आली आहेत, त्याचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उपरोक्त योजनांतर्गत जिल्हानिहाय विकास कामांची माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची कामे राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये घेण्यात आली आहेत.
(३) व (४) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सदर कामांबाबत संबंधित कंत्राटदारांचे अंतिम देयक अदा करण्यापुर्वी शासकीय कंत्राट रकमेवर कराच्या बदललेल्या परिणामाबाबत वित्त विभागाने दिनांक १९/०८/२०१७ व दिनांक ११/०९/२०१७ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसारच जी.एस.टी. रकमेचे समायोजन करुन त्याप्रमाणे देयक अदा करण्याची आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सर्व कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## बीड जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी यांचे प्रलंबित सेवानिवृत्ती उपदान व इतर थकबाकी मिळण्याबाबत

**(३७)** * **१८०९३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हापरिषदेतील सेवानिवृत्त शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी यांचे प्रलंबित असलेले सेवा निवृत्ती नंतरची उपदान, अंशराशीकरण व इतर थकबाकी अद्यापही मिळाली नसल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्रा.) तसेच तालुक्यातील गटविकास पंचायत समिती जिल्हा बीड यांना निवेदने देवूनही याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून, तदनुषंगाने बीड जिल्हापरिषदेतील सेवानिवृत्त शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी यांचे प्रलंबित असलेले सेवा निवृत्ती उपदान, अंशराशीकरण व इतर थकबाकी मिळण्यासाठी व याकडे जाणीवपुर्वक

दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेच्या निविदेतील कागदपत्रांद्वारे गैरकारभार होत असल्याबाबत

**(३८) * १८१४६ प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेच्या निविदेतील कागदपत्रांद्वारे होत असलेल्या गैरकारभाराबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पाणीपुरवठा मंत्री, यांना दिनांक २२/०८/२०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील संपूर्ण निविदा प्रक्रियेची चौकशी करुन चुकीच्या निविदा रद्द करण्याबाबत तसेच संबंधित दोषींची विभागीय चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बीडी कामगारांच्या योजनेतील रुग्णालये पूर्ववत सुरु करुन आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * १७८१८ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: पुणे शहरातील बीडी कामगारांच्या योजनेतील रुग्णालये बंद करण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयाविरोधात बीडी कामगार महासंघाच्या वतीने पुणे येथील सोनवणे रुग्णालयासमोर बीडी कामगारांनी आंदोलन केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या या धोरणामुळे गरीब बीडी कामगारांना आजारावरील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात जावे लागणार असल्यामुळे राज्यातील हजारो बीडी कामगार आरोग्याच्या सेवा सुविधा पासून वंचित राहणार आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीडी कामगारांसाठी असणाऱ्या योजना राज्य कामगार विमा मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आल्या असून बीडी उद्योग चालक त्यांचा हिस्सा सदर मंडळाकडे जमा करणार आहेत काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाने अंदाजपत्रकात तरतूद करावी यादृष्टीने राज्य शासनाने सदर प्रकरणी पाठपुरावा केला आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने राज्यातील तसेच पुणे शहरातील बीडी कामगारांच्या योजनेतील दवाखाने पूर्ववत सुरु करुन बीडी कामगारांना आरोग्य सुविधा उपलबध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर बाब ही केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून, कामगार कल्याण संघटनांचे (LWO) रुग्णालये / डिसपेंन्सरी, पुणे याचे हस्तांतरण राज्य कामगार विमा महामंडळ (ESIC) योजनेतील रुग्णालयात करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. याविरुध्द बीडी कामगार संघ, पुणे यांनी बीडी कल्याण निधी डिसपेंन्सरी, पुणे येथे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी आंदोलन केले होते. त्यावेळी त्यांनी निवेदनाची प्रत तेथील आरोग्य अधिकाऱ्यांना सुपूर्द केली आहे.

बीडी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९७६ केंद्र शासनाच्या दिनांक ५ मे, २०१७ रोजीच्या राजपत्राद्वारे (असाधारण भाग II) रद्द करण्यात आला असला तरी, कामगार कल्याण संघटनेमार्फत (LWO) चालवली जाणारी रुग्णालये / डिसपेंन्सरी कार्यरत राहणार असल्याने बीडी कामगार वैद्यकीय सुविधांपासून वंचित राहणार नाहीत, असे केंद्र शासनाने कळविले आहे. तसेच उत्पादित बीडीवर आता कोणतीही कर आकारणी आणि उपकर वसूल केला जात नसला तरी कामगार कल्याण संघटनांची (LWO) रुग्णालये /डिसपेंन्सरी चालवण्यासह कल्याणकारी योजनांवरील खर्चाची पूर्तता करण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जातो.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात हिवताप आजाराचा प्रसार रोखून रुग्णांना उपचार मिळण्याबाबत

**(४०) * १८०३५ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात माहे जानेवारी ते डिसेबर, २०२२ या कालावधीत १२ लाख ४ हजार ६५९ रुग्णाचे रक्ताचे नमुने तपासले असता ९२०५ हिवतापाचे रुग्णांपैकी १३ जणांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुर्गम भागात अपुऱ्या आरोग्यविषयक सोयी सुविधा उपलब्ध असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने गडचिरोली जिल्ह्यात हिवताप या आजाराचा प्रसार रोखून रुग्णाना उपचार मिळावेत तसेच इतर भागात तातडीने आरोग्यविषयक सोयी सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यात १२ तालुके असून ४८ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ सामान्य रुग्णालय, १ महिला व बाल रुग्णालय, ९ ग्रामीण रुग्णालय व ३ उपजिल्हा रुग्णालय असून या संस्थांद्वारे हिवतापासाठीचे सर्व प्रतिबंधात्मक व उपचारात्मक सेवा व सोयीसुविधा पुरविल्या जातात.
(३) आरोग्य विषयक सोयी सुविधा मध्ये सन २०२१ मध्ये एकूण हिवताप दूषित रुग्ण १२३२६ होते. तर सन २०२२ मध्ये ही रुग्णसंख्या ९२०५ इतकी आहे. त्यापैकी ८५७५ रुग्ण हे नियमित सर्वेक्षणात व ६३० रुग्ण हे विशेष मोहिमेद्वारे दूषित आढळून आलेले आहेत. सन २०२२ मध्ये हिवताप रुग्णसंख्या सन २०२१ च्या तुलनेत २५% नी कमी झालेली दिसून येत आहे. हिवताप रुग्णांमध्ये वाढ किंवा घट झाली यासाठी दर आठवड्याला प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तरावर अन्वेषण केले जाते.
आजाराचा प्रसार रोखण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-
१) सर्वेक्षण :- i) आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी ताप सर्वेक्षण.

ii) हिवताप समस्याग्रस्त प्रा.आ. केंद्रामध्ये गडचिरोली येथे फेब्रुवारी व डिसेंबर या २ महिन्यामध्ये केलेल्या विशेष मोहिमेत २,७७,३६७ लोकांचे मोफत रक्त नमुने तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ६३० दूषित रुग्ण आढळून आले. हिवताप रुग्ण शोध मोहिमेद्वारे हिवताप दूषित रुग्ण आढळून आलेल्या बाधित व्यक्तींना मोफत उपचार करण्यात आला आहे.

iii) उद्रेकाच्या ठिकाणी सर्व ताप रुग्णांचे तसेच सहवासित व परिसरातील लोकांचे जलद ताप सर्वेक्षण व किटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जाते.
iv) नियमितपणे हिवताप निदान व उपचार हे प्रा.आ. केंद्र व उपकेंद्राद्वारे गाव, वाडी व वस्ती येथे मोफत केले जाते.
२) किटक नियंत्रणासाठी करीत असलेल्या उपाययोजना :- किटकशास्त्रीय सर्वेक्षणांतर्गत आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत रोज घरामध्ये दैनंदिन किटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जाते. आरोग्य सेवक, आशा, किटकसंमाहारक इ. घरोघरी भेटी देतात. दूषित कंटेनर रिकामे करतात व जे कंटनेर रिकामे करु शकत नाहीत अशा कंटेनरमध्ये अळीनाशक औषध वापरले जाते. हिवतापासाठी अतिसंवेदनशील म्हणजे ज्या गावांचा API > १ आहे अशा उद्रेकग्रस्त गावांमध्ये किटकनाशकाची घरोघरी फवारणी करण्यात येते व त्याचबरोबर उद्रेकाचे संनियंत्रण केले जाते. डास नियंत्रणासाठी API > २ पेक्षा जास्त असलेल्या भागात पारेषण काळात घरोघरी किटकनाशक फवारणीच्या २ फेऱ्या घेण्यात आल्या. माहे जून ते ऑगस्ट व सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत ६५४ गावात किटकनाशक फवारणी करण्यात आली.

३) गडचिरोली जिल्ह्यामध्ये दीर्घकाळ चालणाऱ्या किटकनाशक भारीत मच्छरदाण्याचे (LLIN) वाटप करण्यात आले.
४) जीवशास्त्रीय उपाय योजनांतर्गत डासोत्पत्ती स्थानांमध्ये डास अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात.
५) त्याचप्रमाणे ग्रामपचांयतीच्या सहयोगाने गटारे वाहती करणे, व्हेंट पाईप ना जाळी बांधणे, पाणी साठू न देणे इ. उपाययोजना करण्यात येतात.
६) दुर्गम भागात आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका द्वारे संशयित ताप रुग्णांचे रक्त नमुने शीघ्र निदान चाचणीद्वारे तपासणी करुन दूषित आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना तात्काळ समूळ उपचार करण्यात येतो.
७) जनजागृती :- i) शालेय हिवताप जागृती मोहिमेंतर्गत शाळेतील मुलांना डास अळया ओळखण्याचे प्रशिक्षण देण्यात येते, जेणेकरुन त्याचा उपयोग ते स्वत:च्या घरी डास अळी ओळखू शकतील.

ii) दरवर्षी जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल या दिवशी व संपूर्ण जून महिना हा पारेषण काळ म्हणून घोषित केला जातो. जिल्ह्यातील गावात प्रभातफेरी काढून उपाययोजना केल्या जातात.

iii) गणेश उत्सव, दुर्गा पुजा उत्सव येथे हिवताप आजाराविषयी प्रदर्शन लावून जनमानसात किटकजन्य आजाराबाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतात.

iv) राज्यामध्ये एप्रिल, २०२२ हा महिना जागतिक हिवताप महिना व जून, २०२२ हा हिवताप प्रतिरोध महिना म्हणून साजरा करण्यात आला.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कोकण विभागातील ठाणे,पालघर आणि रायगड जिल्ह्यांतील तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील कुपोषण व बालमृत्यू रोखण्याकरीता कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत

**(४१) * १७६०० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.प्रसाद लाड, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, पालघर आणि रायगड अशा कोकण विभागात गेल्या आठ महिन्यांत ३ हजार २२६ बालके तीव्र कुपोषित तर ३२ हजार ५३५ बालके मध्यम कुपोषित असल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालाद्वारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला व बालकांच्या लसीकरणापासून इतर अनेक पातळयावर दुर्लक्ष झाल्याचे विदारक कुपोषण व बालमृत्यूच्या एकात्मिक बालविकास योजनेच्या अहवालात १० हजार बाल मृत्यू झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकात्मिक बाल सेवा योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यात १८५४ अंगणवाडी केंद्र असून यामध्ये १ लाखांहून अधिक बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण दिले जाते. तर पालघर जिल्ह्यातील जव्हार, वाडा, मोखाडा, तलासरीसह वसईमध्येदेखील कुपोषित बालके असल्याचे आढळून आले असून या परिसरात गरोदर महिलांना पोषक आहाराचा अभाव असल्याने कमी वजनाचे बाळ जन्माला येत असून पोषण आहार न मिळाल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले असून अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांना सकस आहाराचा पुरवठा केला जातो तसेच बालकांच्या वजन, उंचीची नोंद घेतली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकण विभागातील सर्वाधिक बालके ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात असून ११४१ तीव्र कुपोषित बालकांपैकी ६३१ तीव्र कुपोषित बालके ही फक्त शहापूर तालूक्यात तर पालघर जिल्ह्यात एकूण १४०५ तीव्र कुपोषित बालकांपैकी जव्हारमध्ये ४२४ आणि रायगड जिल्ह्यातील कर्जतमध्ये १७१ सर्वाधिक कुपोषित बालके तर औरंगाबाद जिल्ह्यात ७६१५ बालके कुपोषित असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील वाढते कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी व शहरी भागातील अति तीव्र कुपोषित बालकांना कुपोषण मुक्त करण्यासाठी शासनाने नागरी बालविकास केंद्रे सुरू करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे काय, असल्यास, आतापर्यंत किती बालविकास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत, त्याचे स्वरुप काय आहे,

(६) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील कोकण विभागातील ठाणे पालघर आणि रायगड या जिल्ह्यासह औरंगाबाद जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कुपोषित बालके असून निधीची उपलब्धता करुन कुपोषण व बालमृत्यू कायमस्वरुपी रोखण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशंत: खरे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत माहे डिसेंबर २०२२ या महिन्याच्या मासिक प्रगती अहवालानुसार ठाणे, पालघर, रायगड या जिल्हयांची कुपोषणाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके (MUW) | तीव्र कमी वजनाची बालके (SUW) |
|---|---|---|---|---|
| ठाणे | २५८६१० | २३४९०६ | २११२१ | २५८३ |
| पालघर | १६८६४७ | १३०३६४ | ३२७३१ | ५५५२ |
| रायगड | १२८४८१ | १२४९१८ | ३०३७ | ५२६ |
| एकूण | ५५५७३८ | ४९०१८८ | ५६८८९ | ८६६१ |

(२) हे अंशत: खरे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा याजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ महिन्याच्या मासिक प्रगती अहवालानुसार अंगणवाडी क्षेत्रातील बालमृत्यूची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| राज्य / जिल्हा | जिवंत जन्म | ० ते १ वर्ष वयाची अर्भक मृत्यू | १ वर्ष ते ५ वर्ष वयाची बाल मृत्यू |
|---|---|---|---|
| राज्य | ९३०३०२ | ९६४९ | २५९२ |
| ठाणे | ३२७९७ | १५१ | ४८ |
| पालघर | २८९२० | २०० | ६५ |
| रायगड | १९१५७ | ६३ | २९ |

(३) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यात ५ ग्रामीण प्रकल्प, ४ आदिवासी प्रकल्प व ११ नागरी प्रकल्प असे एकूण २० बालविकास प्रकल्प कार्यालये कार्यरत असून त्यामध्ये ३४५० मुख्य अंगणवाडी केंद्र व २९८ मिनी अंगणवाडी केंद्र असे एकूण ३७४८ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत. सदर अंगणवाडी केंद्रांमध्ये माहे डिसेंबर, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार ठाणे जिल्ह्यात ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील पूर्व प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या बालकांची संख्या १०८७४९ एवढी आहे.

माहे डिसेंबर, २०२२ या महिन्याच्या मासिक प्रगती अहवालानुसार पालघर जिल्ह्यातील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा / क्षेत्र | वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके (MUW) | तीव्र कमी वजनाची बालके (SUW) |
|---|---|---|---|---|
| पालघर जिल्हा | १६८६४७ | १३०३६४ | ३२७३१ | ५५५२ |
| जव्हार | १२८१८ | ७१८६ | ४४७७ | ११५५ |
| वाडा | १५९२६ | १२६१० | २६५० | ६६६ |
| मोखाडा | ७९९५ | ५४३५ | २२५२ | ३०८ |
| तलासरी | १६१५८ | ११८५५ | ३९०३ | ४०० |
| वसई | ३३५९५ | ३०३४१ | २९०१ | ३५३ |

अंगणवाडीतील गरोदर महिला व स्तनदा मातांना नियमित घरपोच आहार (THR) देण्यात येतो, ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना नियमित घरपोच आहार (THR) देण्यात येतो. तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार अंगणवाडीत खाऊ घालण्यासाठी देण्यात येत आहे.

अंगणवाडी केंद्रामध्ये ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांचे वजन व उंची नियमित घेतली जाते. त्यानुसार मागील वर्षातील डिसेंबर, २०२१ या महिन्याची कुपोषणाची आकडेवारी पाहता डिसेंबर, २०२२ या महिन्यात खालीलप्रमाणे राज्यातील तसेच पालघर जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येत आहे.

राज्य -

| कालावधी | वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके (MUW) | तीव्र कमी वजनाची बालके (SUW) |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर, २०२१ | ६१६१०२५ | ५६२२८१०<br>(९१.२६%) | ४५६३११<br>(७.४१%) | ८१९०४<br>(१.३३%) |
| डिसेंबर, २०२२ | ५९६६५८२ | ५४६४६५९ | ४२७३८९ | ७४५३४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (९१.५९%) | (७.१६%) | (१.२५%) |

पालघर जिल्हा -

| कालावधी | वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके (MUW) | तीव्र कमी वजनाची बालके (SUW) |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर, २०२१ | १७२४४६ | १३३२५३ (७७.२७%) | ३३२६६ (१९.२९%) | ५९२७ (३.४४%) |
| डिसेंबर, २०२२ | १६८६४७ | १३०३६४ (७७.३०%) | ३२७३१ (१९.४०%) | ५५५२ (३.२९%) |

(४) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार कुपोषणाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके (MUW) | तीव्र कमी वजनाची बालके (SUW) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे जिल्हा | २५८६१० | २३४९०६ | २११२१ | २५८३ |
| २ | शहापूर | २८३१८ | २३०२४ | ४३६७ | ९२७ |
| ३ | पालघर जिल्हा | १६८६४७ | १३०३६४ | ३२७३१ | ५५५२ |
| ४ | जव्हार | १२८१८ | ७१८६ | ४४७७ | ११५५ |
| ५ | रायगड जिल्हा | १२८४८१ | १२४९१८ | ३०३७ | ५२६ |
| ६ | कर्जत | १४८३७ | १३९७२ | ७१३ | १५२ |
| ७ | औरंगाबाद जिल्हा | २३८७८५ | २१८१०८ | १६६८४ | ३९९३ |

(५) राज्यातील शहरी भागातील अति तीव्र कुपोषित बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणणेसाठी नागरी बालविकास केंद्र सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. सद्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर मुंबई उपनगर जिल्ह्यात चेंबूर, गोवंडी, मानखुर्द, ट्रॉम्बे, मुलूंड (पूर्व), शिवाजीनगर या प्रकल्पामंध्ये प्रायोगिक तत्वावर ७२ एवढे नागरी बालविकास केंद्रे सुरु करण्यात आलेली असून त्यामध्ये २५७ बालकांना दाखल करण्यात आले आहे. अंगणवाडी केंद्रात लाभार्थ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी करुन तीव्र कुपोषित बालके आढळून आल्यास त्यांना नागरी बालविकास केंद्रात दाखल केली जातात, सदर लाभार्थ्यांना Energy Dense Nutritious Food (EDNF) हा आहार दिला जातो. तसेच जी अति तीव्र कुपोषित बालके (SAM) दुर्धर आजाराने आजारी आहेत. त्यांना Nutrition Rehabilitation Centre (NRC) यामध्ये दाखल करण्यात येते.

(६) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येतात.

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये

शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

सदर उपाययोजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचतात की नाही याबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी व मुख्यसेविका यांचेकडून पाहणी करण्यात येते.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

-----------------

## राज्यातील ग्रामविकास विभागाची कोविड विमा प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४२)** * **१८१५२ प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असलेले कंत्राटी पध्दतीवरील कर्मचारी/ कामगार कोविड संबंधित कर्तव्ये पार पाडत असताना कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागण होऊन दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना रुपये ५० लाखाचे विमा कवच /सानुग्रह सहाय्य देण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली असून राज्यातील गत एक वर्षापासून ग्रामविकास विभागाची एकूण २५७ कोविड विमा प्रकरणे अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणे अद्याप प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू विमा प्रकरणे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी कर्मचारी ग्रामपंचायत कर्मचारी/ संगणक परिचालक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असलेले कंत्राटी पध्दतीवरील कर्मचारी, कामगार/ कोविड संबंधित कर्तव्ये पार पाडत असताना कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागण होऊन दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना रुपये ५०/- लाखाचे विमा कवच / सानुग्रह सहाय्य देण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली असून राज्यातील गत एक वर्षापासून ग्रामविकास विभागाकडे एकूण १९७ कोविड विमा प्रकरणे अद्यापपर्यंत प्रलंबित आहेत.

(२) कर्तव्यावर कार्यरत असताना कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागन होऊन मृत्यू झालेल्या ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त जिल्हा परिषद आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचारी,

ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असलेली कंत्राटी पध्दतीवरील कर्मचारी / कामगार यांच्या वारसांना रुपये ५०/- लाख रक्कम विमा कवच म्हणून प्रदान करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्याबाबत प्रस्ताव शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२० / प्र.क्र.४ / व्यय-९ दिनांक २९/०५/२०२२ मधील परिच्छेद ३ ब मधील अनुक्रमांक-४ नुसार वित्त विभागा पाठविण्यात आला होता.सदर प्रस्तावावर वित्त विभागाकडे ज्या लेखाशिर्षातून वेतनाव्यतिरिक्त बाबींचा खर्च भागविण्यात येतो त्या लेखाशिर्षा मधील अर्थसंकल्पीय निधीतून खर्च भागविण्यात यावा. नविन लेखाशीर्ष घेण्याची आवश्यकता नाही. असे निर्देश दिले आहेत.

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०२१/प्र.क्र.२४३/नवि-२० दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ अन्वये राज्यातील “अ” “व” महानगर पालिका वगळता “क” “ड” महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषद/नगरपंचायती क्षेत्रातील कोविड विरोधी मोहिमेमध्ये कर्तव्य पारपाडताना कोरोनाची लागन होऊन मृत्यूमुखी पडलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासन व राज्य शासनाच्या धर्तीवर रुपये ५०/- लाख सानुग्रह सहाय्यक अनुदान यासाठी तरतुद करण्यासाठी नविन लेखाशीर्ष उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.सं.ख.वि/चा.१/नविवि/युओआर-६९/ २०२१-२२ / ३५० दिनांक २० /०९/२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात आला आहे. यानुषंगाने प्रस्ताव वित्त विभागास फेर सादर केला असता, वित्त विभागाने सदरचे सानुग्रह अनुदानही एक वेळची बाब आहे. यासाठी नव्याने लेखाशीर्ष घेण्याची आवश्यकता नाही असे कळविले आहे.

(३) याबाबत नमूद करण्यात येते की, कर्तव्य बजावताना कोविड १९ या संसर्ग आजारामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांस रुपये ५०/- लाखांची विमा कवच रक्कम अदा करण्याकरीता विभागामध्ये प्राप्त असलेल्या प्रस्तावांची तपासणी करून आवश्यक कागदपत्र उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत विभागामध्ये प्राप्त प्रस्तावांसाठी निधीची मागणी सन २०२२-२३ च्या सुधारित अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. निधी उपलब्ध होताच तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता होताच कर्तव्य बजावताना कोविड-१९ या संसर्ग आजारामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांस रुपये ५० लाखांची विमा कवच रक्कम अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.